बुधवार, दि २९ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ८ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## गुटखा माफिया आणि पोलिसांची निःशब्द भूमिका

# जालन्यात बंदी की बंदोबस्त ?

**दीपक शेळके**

**जालना** - राज्यात २०१२ पासून गुटख्यावरील संपूर्ण बंदी लागू आहे. मात्र, जालना जिल्ह्यात ही बंदी कागदावरच शिल्लक राहिली आहे, असे वास्तव दररोजच्या व्यवहारातून दिसून येते. शहरात कुप्रसिद्ध गुटखा माफिया सतीश उर्फ लाला यांचे नाव स्थानिक नागरिकांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना ठाऊक आहे. तरीदेखील त्याच्या गाड्यांमधून दररोज टनोनटन गुटखा येतो, विकला जातो, आणि तो बाजारात कोणत्याही अडथळ्याशिवाय उपलब्ध असतो. जप्तीच्या बातम्या वारंवार झळकतात, पण त्या केवळ औपचारिक वाटतात. कारण जप्तीनंतरही वितरण साखळी नेहमीप्रमाणे सुरु राहते. म्हणजेच कारवाई आणि गुन्हेगारी हे दोन्ही एकाच वेळी चालू ठेवणं, हीच प्रणाली जालन्यात दृढ झाल्याचं चित्र दिसतं.

प्रश्न असा निर्माण होतो की, एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध मालवाहतूक, साठवणूक आणि विक्री होत असताना, पोलिसांचे डोळे खरोखरच बंद आहेत का? की त्यांच्यावर कोणाचा तरी दबाव आहे? शहराच्या विविध भागात गुटखा खुलेआम विकला जात असताना, गस्त पथकं कुठे असतात?

जालन्यात सध्या गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे - चोरी, लुटमारी, दरोडे, खून अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यातच गुटख्याच्या अवैध व्यवहारांनी गुन्हेगारीला आर्थिक इंधन पुरवले आहे. त्यामुळे गुटखा हा केवळ आरोग्यविषयक नव्हे, तर कायदासुव्यवस्थेचा प्रश्न झाला आहे.

एक पॅकेट गुटख्यातून सुरू होणारा व्यवहार लाखो रुपयांपर्यंत पोहोचतो. या चक्रव्यूहात काही पोलीस, व्यापारी, आणि स्थानिक राजकीय घटकांचा सहभाग असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. जप्तीची आकडेवारी दाखवून कागदोपत्री यश मिरवले जाते, पण प्रत्यक्षात गुटखा माफियांची पकड आणखीन मजबूत होत आहे.

गुटखा माफिया लाला आणि त्याचे सहकारी हे आता गुन्हेगारी अर्थव्यवस्थेचे केंद्र बनले आहेत. ते फक्त गुटखा विकत नाहीत, तर त्यामार्फत स्थानिक स्तरावर दादागिरी, खंडणी आणि आर्थिक दबाव निर्माण करतात. त्यामुळे सामान्य व्यापारी आणि किरकोळ दुकानदार भयभीत आहेत.

गुटखा माफियांच्या गाड्यांवर, गोदामांवर आणि वितरण जाळ्यावर कठोर कारवाई करण्यासाठी पोलिसांकडे अधिकार आहेतच, पण त्यांचा वापर करण्यासाठी राजकीय पाठबळाची गरज आहे. जालन्यातील अवैध धंदे आणि राजकीय संरक्षक यांच्यातील संबंध मोडले नाहीत, तर कोणतीही कारवाई फक्त दिखाऊ ठरेल.

राजकीय इच्छाशक्तीच या समस्येचं प्रभावी उत्तर आहे. गुटखा, सट्टा, दारू आणि बेकायदेशीर कर्जव्यवहार यांम ुळे तयार झालेल्या अंडरवर्ल्डला धडक देण्यासाठी प्रशासनाकडे ताकद आहे - पण त्यासाठी निर्भय निर्णय आणि स्वच्छ राजकीय इच्छा आवश्यक आहे.

गुटखा हा केवळ आरोग्यविषयक धोका नाही, तर तो भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि सामाजिक अध:पतनाचा मूळ घटक बनला आहे. जालन्यातील शांतता आणि सुरक्षितता पुन्हा प्रस्थापित करायची असेल, तर पोलीस आणि लोकप्रतिनिधींनी जाणत्या अंधत्वातून बाहेर पडावे लागेल.

नागरिक आता कारवाईची नाटके नव्हे, तर खरी अंमलबजावणी पाहू इच्छित आहेत. गुटखा माफिया आणि त्याच्या राजकीय संरक्षकांवर निर्णायक घाव घालणे - हीच आजच्या परिस्थितीत जालन्याला स्वच्छ हवा देणारी पहिली पायरी ठरेल.

## जालन्यात आज काँग्रेस प्रवेश सोहळा

# अ. रशीद यांचे समर्थक काँग्रेसमध्ये दाखल होणार

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहर आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भव्य जाहीर प्रवेश सोहळ्याचे आयोजन बुधवार (दि. २९) रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अब्दुल रशीद यांचे असंख्य समर्थक कार्यकर्ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश करणार असून, या प्रवेशामुळे जालना जिल्ह्यातील काँग्रेस संघटनाला नवसंजीवनी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कॉंग्रेसचे नेते माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशामुळे जालना कॉंग्रेसमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. अब्दुल रशीद यांच्या काँग्रेस प्रवेशाने काँग्रेसला नवे बळ मिळाले असून आता समर्थक कार्यकर्त्यांच्या प्रवेशानंतर काँग्रेसला नवसंजीवनी मिळणार आहे.

पक्षप्रवेशाचा हा कार्यक्रम जुना जालन्यातील घोगरे स्टेडियम येथे दुपारी १ वाजता होणार आहे. पावसाची शक्यता असल्याने ऐनवेळी आयोजकांनी मुक्तेश्वर तलावाजवळील लॉन्सचा पर्याय खुला ठेवला आहे. या सोहळ्याला म हाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे जालना काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

अब्दुल रशिद यांनी गेल्या काही वर्षांत जालन्यात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय काम केले आहे. विविध समाजघटकांशी त्यांचा दुवा निम र्ाण झाला असून, ते आता काँग्रेसच्या विचारधारेतून लोकशाही आणि विकासाचा मार्ग स्वीकारणार आहेत. त्यांच्या प्रवेशानंतर आता अनेक कार्यकर्ते, युवक, व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे पक्ष संघटन बळकट करण्यासाठी राज्यभर दौरा करत आहेत. त्यांच्या म ार्गदर्शनाखाली नवीन चेहरे पक्षात दाखल होत असून, जालना जिल्ह्यातील हा प्रवेश सोहळा राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

जालना जिल्ह्यात काँग्रेस पक्ष संघटनात्मक अडचणींमधून जात आहे. सत्ताधारी पक्षांच्या बळकटीमुळे तसेच माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या भाजपा प्रवेशामुळे स्थानिक स्तरावर काँग्रेस काहीशी मागे पडली होती. म ात्र अब्दुल रशीद यांचा प्रवेश हा त्या पार्श्वभूमीवर संघटनाला नवी ऊर्जा देणारा क्षण ठरू शकतो.

राजकीय विश्लेषकांच्या मते, अब्दुल रशीद यांचे सामाजिक जाळे आणि स्थानिक पातळीवरील संपर्क काँग्रेससाठी प्रभावी ठरू शकतात. त्यामुळे आगामी निवडणुकांपूर्वी पक्षात नवचैतन्य येईल, असा पक्षातील नेत्यांचा विश्वास आहे.

शहरात या कार्यक्रमाच्या पोस्टर्स, बॅनर्स आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रचार सुरू आहे. अनेक युवकांनी या सोहळ्यात उपस्थित राहण्यासाठी तयारी सुरू केली आहे. काँग्रेसच्या घोषवाक्यांनी जालना शहरातील वातावरण रंगले आहे. उद्या होणाऱ्या या प्रवेश सोहळ्याने जालना काँग्रेसला नवचैतन्य मिळेल का, की हा केवळ राजकीय उत्सव ठरेल. याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# भारतीय मानवाधिकार परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी प्रमोद तोतला यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी** - प्रत्येक भारतीयांच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करणे या मूलभूत विचारावर काम करणाऱ्या भारतीय मानवधिकार परिषदेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी औषधी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद तोतला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



अनेक सरकारी, खाजगी क्षेत्रात अधिकारी नागरिकांना कामासाठी विनाकारण त्रास देतात. अशा केसेस मधे लक्ष घालने व संबंधितास न्याय मिळवून देने हे संस्थेचे कार्य असेल. केंद्र सरकार द्वारे नोंदणीकृत ही गैर सरकारी संस्था (NGO) असून देशभर या संस्थेचे ७० हजार सदस्य आहेत.संस्थेचे उद्देश्य संविधानद्वारे मिळालेल्या मूलभूत अधिकाराविषयी जागरूकता निर्माण करणे, मानवाधिकारांना प्रेरणा देणे आणि त्या अधिकारांचे संरक्षण करणे हे आहे. देशभरात शैक्षणिक, आरोग्य व अध्यात्मिक क्षेत्रात कार्य करणे व सुविधा उत्पन्न करणे तसेच जणमाणसामध्ये, वेगवेगळ्या सम ाजामध्ये सौहार्द वाढवणे, अन्यायग्रस्त नागरिकांना कायदेशीर मार्गदर्शन मिळवून देणे व वेळप्रसंगी देश पातळीपर्यंत लढा देने हे महत्वाचे कार्य संस्थेमार्फत केले जाते.

जालना जिल्ह्यामध्ये सभासद बनवून त्यांना मानवाधिकारा बाबत प्रशिक्षित करणे व संस्थेचे कार्य जिल्हाभर राबवणे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे या वेळी प्रमोद तोतला यांनी सांगितले. औषधी संघटनेचे काम करत असताना अनेक सामाजिक उपक्रम राबवले त्याचा फायदा या कामात होईल असेही ते म्हणाले.




संपादकीय

# निवेदन, आश्वासने नव्हे; ठोस कृतीची वेळ

## राजकीय संरक्षण मोडा, अवैध धंद्यांवर गदा आणा, आणि गुंडगिरीच्या मुळावर घाव घाला

जालना जिल्हा पूर्वी शांततेसाठी, प्रामाणिक उद्योजकतेसाठी आणि सामाजिक एकतेसाठी ओळखला जात होता. परंतु आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. रस्त्यावर बेधडक फिरणारे गुंड, व्यापाऱ्यांना व शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या धमक्या, आणि प्रत्येक पंधरा दिवसांनी घडणाऱ्या खूनाच्या घटना - या सर्व गोष्टी जालन्याच्या सुरक्षेच्या अधोगतीची जिवंत उदाहरणं आहेत. नागरिक भयभीत आहेत, आणि त्यांचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी मंत्री राजेश टोपे आणि इतर जनप्रतिनिधींनी पोलीस अधीक्षकांना निवेदन दिलं - हा उपक्रम स्वागतार्ह आहे. पण खरी कसोटी आहे ती कृतीची! कारण निवेदनं, बैठकं आणि आश्वासने या जालना जिल्ह्याच्या जनतेने अनेक वर्षांपासून ऐकल्या आहेत; मात्र जमिनीवर परिणाम फारसा दिसत नाही. जालन्यातील वाढती गुन्हेगारी ही केवळ सामाजिक समस्या नाही, ती राजकीय आणि आर्थिक साखळीचा परिणाम आहे. गुटखा, दारू, सट्टा आणि बेकायदेशीर कर्जव्यवहार यांच्या माध्यमातून काही लोक दादा बनले आहेत. या 'गुंडगिरी अर्थव्यवस्थे'ला स्थानिक राजकीय संरक्षण मिळत असल्याची चर्चा जनतेत आहे. काही गुन्हेगारांवर कारवाई झाली की त्यांना वाचवण्यासाठीच राजकीय नेते पोलिस ठाण्यात जातात, हे सर्वश्रुत आहे. मग अशा परिस्थितीत पोलिसांवर केवळ टीका करणे न्याय्य ठरेल का? नाही. राजकीय इच्छाशक्तीच खरी किल्ली आहे.

शांतता, सुरक्षा आणि सुव्यवस्था या केवळ पोलिसांच्या नव्हे, तर जनप्रतिनिधींच्याही जबाबदाऱ्या आहेत. संसदेत आणि विधानसभेत बोलणे महत्त्वाचे आहेच, पण आपल्या जिल्ह्यातील परिस्थिती सुधारण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखवणे हे अधिक महत्त्वाचे आहे. जर गुन्हेगारीच्या मुळाशी राजकीय आशीर्वाद असेल, तर त्या मुळावर कुऱ्हाड चालवणे ही जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींची प्राथमिक जबाबदारी आहे. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दिलेला इशारा - कार्यवाही झाली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरू - ही भावना जनतेच्या मनातील आक्रोश प्रतिबिंबित करते. पण जनता आता इशाऱ्यांपेक्षा कृतीची अपेक्षा करते. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी जर प्रशासनावर दबाव आणून ठोस पावले उचलतील, तर गुन्हेगारी रोखणे शक्य आहे. पोलिस दलावर ताण आहे हे खरे, पण त्याच वेळी निवडक कारवाया आणि राजकीय दबावाखाली घेतलेले निर्णय हे गुन्हेगारीला खतपाणी घालतात. रात्रीची गस्त, सीसीटीव्ही तपासणी, पेट्रोलिंग वाढवणे, हेल्पलाइन सक्रिय ठेवणे - या मागण्या योग्य आहेत, पण त्या केवळ आदेशांपुरत्या न राहता प्रत्यक्ष अमलात आणल्या गेल्या पाहिजेत. जालना जिल्ह्याला सध्या 'कायदा-सुव्यवस्थेच्या आपत्कालीन स्थिती'तून बाहेर काढायचं असेल, तर केवळ निवेदनं, बैठका आणि प्रेस नोटीसेस पुरेशा ठरणार नाहीत. राजकीय संरक्षण मोडा, अवैध धंद्यांवर गदा आणा, आणि गुंडगिरीच्या मुळावर घाव घाला. नागरिकांचा विश्वास परत मिळवायचा असेल, तर कायदा सर्वांसाठी समान आहे हे प्रत्यक्ष दाखवून द्यावं लागेल. जालन्याची जनता आता केवळ बोलणे नाही, तर 'उत्तरदायित्वासह कृती'ची वाट पाहत आहे.

# चिमुकल्यांनी साकारले रामायणातील पात्र

## 'माय छोटा स्कूल'मध्ये रंगले दिवाळी स्नेहसंमेलन; नृत्य, नाटिकांमधून दिला सणाचा संदेश




**माय छोटा स्कूल येथे दिवाळी स्नेहसंमेलनात रामायणातील पात्रांची भूमिका साकारताना विद्यार्थी... श्रीनिधी हीने सीतेची भूमिका, स्वराज शिंदेने श्रीराम, तर शिवराजने लक्ष्मणाची भूमिका अप्रतिमरीत्या साकारत उपस्थितांची वाहवा मिळविली.**

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील माय छोटा स्कूलमध्ये शुक्रवारी (दि. १७ ऑक्टोबर) दिवाळी स्नेहसंमेलनाचे आयोजन उत्साहात पार पडले. पारंपरिक सणांच्या उगम आणि महत्त्वाची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**रामायणाचे सुंदर सादरीकरण**

या स्नेहसंमेलनात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी रामायणातील पात्रांचे सजीव दर्शन घडवून सर्वांचे मन जिंकले. श्रीनिधी हीने सीतेची भूमिका, स्वराज शिंदेने श्रीराम, तर शिवराजने लक्ष्मणाची भूमिका अप्रतिमरीत्या साकारली. विद्यार्थ्यांनी संवाद, अभिनय आणि वेशभूषेच्या माध्यमातून रामायणातील आदर्श आणि दिवाळीचा धार्मिक संदर्भ प्रभावीपणे सादर केला. या नाटिकेने उपस्थित पालक आणि पाहुण्यांची वाहवा मिळवली.

वसुबारसपासून सुरू होणाऱ्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना सणांचा सांस्कृतिक आणि सामाजिक अर्थ समजावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. लहान मुलांनी नृत्य, गाणी आणि दिवाळीवरील छोटेखानी कविता सादर करून आनंद, ऐक्य आणि प्रकाश यांचा संदेश दिला.

कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्नेहा देशमुख प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करताना सांगितले की, दिवाळी म्हणजे केवळ सण नसून, सद्गुणांचा अंधारावर विजय साजरा करण्याचा उत्सव आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैशाली चव्हाण, हर्षिका अलवाणी, भारती भानुशाली, प्रियंका हुसे, सरिता साले, जयश्री शेट्टी, सपना दायमा आणि वर्षा कोटा यांनी विशेष परिश्रम घेतले.

संपूर्ण विद्यालयात दिवाळीच्या आनंदाचा माहोल निर्माण झाला होता. रंगीबेरंगी सजावट, दिव्यांची रोषणाई आणि पारंपरिक वेशभूषेत सजलेले विद्यार्थी यामुळे कार्यक्रम रंगतदार झाला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्र येऊन दीपज्योती नमोऽस्तुते चा उच्चार करत सणाच्या शुभेच्छा दिल्या.

# जागतिक इंटरनेट दिन



आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६0 चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या श्रेस ळप शब्दापैकी श्रे शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

अंबडच्या ओमशांती विद्यालयाचे विद्यार्थी १९ वर्षांनी पुन्हा एकत्र!

# आठवणींनी भरलेलं स्नेहमिलन; माजी शिक्षकांना सन्मान, शाळेला भेट वस्तू प्रदान



**अंबड । प्रतिनिधी -** अंबड येथील ओमशांती विद्यालयात तब्बल १९ वर्षांनंतर दहावीच्या २००५ सालच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. जुन्या आठवणी, शिक्षकांविषयी कृतज्ञता आणि पुन्हा एकदा शाळेच्या दालनात भेटण्याचा आनंद. अशा भावनिक वातावरणात हा कार्यक्रम रंगला.

या स्नेहमिलनाचा प्रारंभ ओमशांती विद्यालय प्रांगणात सकाळी झाला. कार्यक्रमाचे आयोजन सुनिल गांगे, सोम नाथ भोजने, कपील वाघमारे आणि गणेश चौथे यांनी संयुक्तपणे केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारीका अंबिलवादे आणि सोमनाथ भोजने यांनी अत्यंत उत्साहात पार पाडले, तर आभार प्रदर्शन सुनिल गांगे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती कुलकर्णी, तसेच माजी शिक्षक भांडळकर सर व मंडलिक सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचे स्वागत फुलांच्या पुष्पगुच्छाने आणि सन्मानचिन्ह देऊन केले. शिक्षकांनी आपल्या माजी विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत पाहून आनंद व्यक्त केला आणि त्यांना शिक्षणातून समाजात चांगले कार्य करण्याचा संदेश दिला.

माजी विद्यार्थ्यांकडून विद्यालयाला फॅन भेट देण्यात आला, तर माजी शिक्षकांना कृतज्ञतेच्या प्रतीक म्हणून लहानशी भेट वस्तू प्रदान करण्यात आली. शाळेच्या प्रांगणात जुनी मैत्री, गप्पा, आणि शाळेतील आठवणींनी वातावरण भारावून गेले. स्नेहमिलनात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः मुलींसाठी 'संगीत खुर्ची' स्पर्धा अत्यंत रंगली. विजेत्यांना छोट्या भेटवस्तूंनी गौरवण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन पुन्हा शाळेचा आनंद अनुभवला, जुने दिवस परत आले असे अनेकांनी भावनिक शब्दात सांगितले.

कार्यक्रमाचा समारोप सर्वांच्या एकत्र राष्ट्रगीताने झाला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनिल गांगे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर सर्व माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम संस्मरणीय बनवला.

# नागरिकांनी ई-कचरा संकलन अभियानात सहभाग नोंदवावा - जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालय व नेचर इको बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड या केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ नोंदणीकृत संस्थेच्या सहकार्याने जिल्हास्तरीय ई-कचरा संकलन अभियान दि.२८ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्याकडे असलेला ई-कचरा जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य सभागृहात जमा करुन या अभियानात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

भारतामध्ये दरवर्षी १.६ दशलक्ष टनापेक्षा अधिक ई-कचरा निर्माण होतो या कचऱ्यापैकी बऱ्याच कचऱ्याची विल्हेवाट ही अनाधिकृत मार्गाने केल्याने त्याचे गंभीर परिणाम पर्यावरणावर होताना दिसून येत आहेत. जिल्ह्यातील नागरिकांना ई-कचऱ्याचा वैज्ञानिक व पर्यावरणपुरक निपटारा करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी दि.२८ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत भारत सरकारच्या खाण मंत्रालय व जवाहरलाल नेहरुन ल्युमिनीयम रिसर्च डेव्हलपमेंट एण्ड डिझाईन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छतोत्सव अभियानांतर्गत नेचर इको बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात ई-कचरा संकलन अभियान आयोजित करण्यात आले आहे. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाच्या कार्यालयातील आपल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या घरातील वापरात नसलेले संगणक, प्रिंटर, मॉनिटर, मोबाईल, बॅटरी, युपीएस, फॅक्स मशिन, स्कॅनर आदि ई-कचऱ्याचे वर्गीकरण करुन जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य सभागृहात संकलन करावे. ई-कचरा संकलन करतेवेळी मुल्य प्रति युनिट/किलो प्रमाणे दिले जाणार आहे. ई-कचरा संकलन अभियानाचा उद्देश कार्यालयामधून तसेच घरगुती स्तरावर निर्माण होणारा ई-कचरा सुरक्षित आणि पर्यावरणपुरक पध्दतीने संकलित करुन त्याचा योग्य निपटारा करणे हा आहे. ई-कचरा उघड्यावर फ`कणे, जाळणे किंवा तोडफोड केल्याने त्यातील शिसे, पारा, कॅडमियम इत्यादी विषारी घटक माती, हवा आणि भुजलात मिसळून प्रदुषण निर्माण करतात व सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम करतात. नोंदणीकृत पुनर्वापरकर्त्याकडे ई-कचरा सुपूर्द केल्यास प्रदुषण रोखता येते तसेच पुनर्वापर योग्य धातू व घटक सुरक्षितरित्या पुर्नप्राप्त करता येतात. अशी माहितीही त्यांन यावेळी दिली.

# हनुमंतखेडा शिवारात उसाला आग...

महावितरणचे दुर्लक्ष; तालुक्यात आठवड्यात दुसरी घटना...

**विशाल देशमुख । जाफराबाद -** तालुक्यात हनुमंतखेडा शिवारात २८ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास बारा ते पंधरा एकर ऊसाला गावठाण फिडरला विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांचा स्पर्श झाल्याने झालेल्या शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या आगीत जवळपास १५ एकर उसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मागच्या आठवड्यात तालुक्यातील निमखेडा बु. येथील शेतात मोठ्या प्रमाणात आग लागून जवळपास ३० ते ३५ एकर ऊसाच्या क्षेत्राला आग लागली होती. यातही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मंगळवारी दुपारी हनुमंतखेडा येथील विष्णु खेडेकर, विठ्ठल खेडेकर, अशोक खेडेकर, सुनील खेडेकर, कैलास अंभोरे यांच्या गट क्रमांक २७० मधील उसाला आग लागून या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मागच्या घटनेत खुद्द शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरत रस्ता रोको केला होता. तरीही महावितरण विभाग याकडे लक्ष देत नाही. हनुमंतखेड येथील आगही एमएसईबी विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे लागली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. एमएसईबीच्या भोंगळ कारभारापुढे शेतकरी प्रचंड वैतागले असून तीव्र संताप व्यक्त करीत आहे. या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दिनांक २६ ऑक्टोबर रोजी अवकाळी पाऊस झाला या पावसामुळे भुजंगराव जयसिंग शेवत्रे यांचे सौर पंपाचे प्लेटचे नुकसान झाले तसेच इतर शेतकरी रामदास शेवत्रे, भीमराव पाटील, ज्ञानेश्वर शेवत्रे, शंकर शेवत्रे, रुस्तुम शेवत्रे या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे.

# अश्विनी दायमा यांना आदर्श व्यापारी पुरस्कार



जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या उपस्थिती सन्मानित

**परतुर । प्रतिनिधी -** येथील सोन्याचे व्यापारी सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग असणारे अश्विन दायमा यांना आदर्श व्यापारी पुरस्कार नुकताच जाहीर झाला. असून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व जिल्हा पोलीस अधीक्षक अजय बन्सल यांच्या हस्ते त्यांना दि.२६/१०/२०२५, रोजी सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी भाजपा व्यापार आघाडीचे विधानसभा अध्यक्ष राजेश मस्के व व्यापारी महासंघ परतूर विभागाचे अध्यक्ष सुरेश मंत्री, आनंदमुंदडा यांची उपस्थिती होती. दीपावली स्नेह मिलना निमित्त आयोजित या पुरस्कार सोहळ्याला हस्तीमल बंब, राज्यअध्यक्ष सतिष निवंगुने, सतिषजी पंच, जगदीशजी ग्रिथ्यानी,, उद्योजक, सुखदेव बजाज, अंकुश राऊत, कासीम बावला, प्रविण मोहता, संदीप काबरा, सौ. सिता मोहिते, सौ. प्रिया जोशी आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्तिती होती.गेल्या अनेक काळापासून भरपूर कार्यक्षेत्रामध्ये सुवर्णकार म्हणून परिचित असलेले अखिल दायमा यांनी व्यापारी म हासंघाच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यक्रम राबवले होते यासह सामाजिक कार्यामध्ये ते पुढाकार असनारे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल परतूर शहरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**




# आगार प्रमुख अजिंक्य जैवळ व तात्कालीन आयुक्तांवर कारवाई व्हावी

## तय्यबबापू देशमुख यांची मागणी; चिंचेचे झाड विनापरवाना तोडल्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मंठा चौफुली परिसरात बसस्थानक पार्सल ऑफिसजवळील सुमारे २० वर्षे जुने चिंचेचे झाड विनापरवाना तोडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी जिल्हाधिकारी तथा प्रभारी आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांच्याकडे निवेदन सादर करून चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जालना महानगरपालिकेचे तात्कालीन आयुक्त संतोष खांडकेकर यांनी आगार प्रमुख अजिंक्य जैवळ यांच्याशी संगनमत करून, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता, जेपीसीच्या सहाय्याने चिंचेचे झाड तोडून टाकले. या घटनेनंतर महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, उलट प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

तय्यब देशमुख यांनी सांगितले की, ते संभाजीनगर (औरंगाबाद) येथे जात असताना त्यांच्या नजरेस झाड तोडलेले दिसले. चौकशी केली असता, स्थानिक रहिवाशांनी सांगितले की झाड बसस्थानक पार्सल ऑफिससमोर होते आणि त्यातून कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नव्हता. त्यामुळे हे झाड तोडण्याचे कारण स्थानिकांना पटले नाही.

**‘झाडं तोडल्यावर काहींवर कारवाई, पण काहींवर नाही’**

निवेदनात पुढे नमूद आहे की, यापूर्वी जालना महानगरपालिकेने मंठा चौफुलीतील एका मेडिकलसमोर झाड तोडणाऱ्या मजुरावर व दुकानमालकावर तत्काळ कारवाई केली होती. मात्र, आगार प्रमुख अजिंक्य जैवळ यांच्याबाबत मात्र आजवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



तसेच, काही स्थानिकांनी सांगितले की, मागील प्रकरणात झाड तोडणारे मजूर रफिक शेख, अहमद शेख, वहिद शेख आणि नवाब शेख या नावाचे होते म्हणून तत्काळ कारवाई झाली, पण सरकारी अधिकारी असल्याने कारवाई टाळली गेली का? असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.

सदर चिंचेचे झाड लांब पल्ल्याच्या प्रवाशांना सावली आणि आसरा देणारे ठिकाण म्हणून ओळखले जात होते. शहरातील नागरिकांनीही या झाडाच्या तोडीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक रहिवासी यांनी यावर पुनर्रोपण व जबाबदार अधिकाऱ्यांवर चौकशीची मागणी केली आहे.

तय्यबबापू देशमुख यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून आगार प्रमुख अजिंक्य जैवळ यांच्यावर शिस्तभंगात्मक कारवाई करावी. नागरिकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने चौकशी करावी. घटनेनंतर प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, शहरात या प्रकरणाची चर्चा जोरदार सुरू आहे. ‘सामान्य नागरिकावर त्वरित कारवाई आणि अधिकारी वर्गावर मौन’ असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जालना शहरात वाढत्या नागरीकरणामुळे झाडांची तोड वाढत चालली आहे. झाडांचे पर्यावरणीय व सामाजिक महत्त्व लक्षात घेता, झाड तोडण्याच्या प्रत्येक घटनेत पारदर्शकता आणि जबाबदारी आवश्यक आहे.

या प्रकरणात जर आरोप खरे असतील, तर हे प्रशासनातील दुहेरी मापदंड दाखवणारे उदाहरण ठरेल. पर्यावरण संरक्षणाचे कायदे पाळले गेले का, हेही तपासण्याची गरज आहे.

# हयातीचे प्रमाणपत्र सादर करावेत

## जिल्हा कोषागार अधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाचे सर्व निवृत्तीवेतन धारक, कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांनी दरवर्षी माहे नोव्हेंबरमध्ये हयातीचे दाखले बँकेत सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने हयात प्रमाणपत्राची संगणकीकृत यादी कोषागारातून बँकेत पाठविण्यात आली आहे. सर्व निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्ती वेतन धारकांनी त्यांचे हयात असल्याचे प्रमाणपत्र दि. १ नोव्हेंबर, २०२५ नंतर संबंधीत बँकेत ओळखपत्राच्या पुराव्यासह जावून दि. १५ नोव्हेंबर, २०२५ पुर्वी द्यावे. तसेच जीवन प्रमाणन प्रणालीवर आपला हयातीचा दाखला अचुक माहिती नोंदवून सुध्दा करता येईल. शक्य न झाल्यास प्रत्यक्ष कोषागारात हजर राहून हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे, अन्यथा डिसेंबरचे निवृत्तीवेतन थांबविण्यात येईल. असे जिल्हा कोषागार कार्यालय, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



# मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा रेल्वे मार्ग

## जालना केंद्रस्थानी ‘पूर्व-पश्चिम’ आणि ‘उत्तर-दक्षिण’ जोडणीचे स्वप्न साकार होण्याची गरज - डॉ. संजय लाखे पाटील

**जालना । प्रतिनिधी -** राज्याच्या पायाभूत विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या अनेक निर्णयांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील आजच्या मंत्रिमंडळ बैठकीतील मराठवाड्यासाठी अपवादाने उल्लेखनीय असलेला आणि स्वागतार्ह असलेला असा निर्णय म्हणजे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेला 'सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गाच्या सुधारित खर्चाला आणि राज्य शासनाच्या ५० टक्के निधी हिश्श्यास मान्यता देण्याचा निर्णय आहे.!’ हा निर्णय मराठवाड्याच्या रेल्वे दळणवळण व्यवस्थेतील आणि विकासासाठी नव्या पर्वाची सुरुवात ठरू शकतात परंतु त्यासाठी दोन अत्यंत महत्त्वाचे प्रस्तावित रेल्वेमार्ग खामगाव-जालना-धाराशिव आणि जळगाव-जालना- धाराशिव. हे दोन्ही मार्ग मंजूर झाल्यास जालना आणि बिड हे ‘पूर्व-पश्चिम’ आणि ‘उत्तर-दक्षिण’ भारत जोडणारे रेल्वे जंक्शन म्हणून उदयास येतील . यामुळे अविकसित भागास अश्या मराठवाडा आणि विदर्भातील व-हाड प्रांताचा विकासाचा वेग अनेकपटींनी वाढेल, असे मत मराठवाडा अनुशेष निर्मूलन आणि विकास मंच संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील यांनी व्यक्त केले आहे.



जालना हे भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राच्या मध्यभागी स्थित असून, सध्या विदर्भातील खामगाव आणि खान्देश मधील जळगाव व मराठवाड्यातील धाराशिव पुढे सोलापूर दक्षीण भारत या दरम्यानचा रेल्वे दुवा तुटलेला आहे. या मार्गाची निर्मिती झाल्यास औद्योगिक वाहतूक, कृषी उत्पादनांचा पुरवठा आणि पर्यटन, धार्मिक पर्यटन विशेषतः शेगाव तुळजापूर पंढरपूर येरमाळा ही पवित्र क्षेत्र या सर्वांवर सकारात्मक परिणाम होईल. विशेषतः धाराशिव-तुळजापूर-सोलापूर मार्गाच्या मंजुरीनंतर, आता खामगाव-जालना-धाराशिव आणि जळगाव जालना या मंजूर असलेल्या रेल्वे मार्गाचा पुढे बिड ( आणि धाराशिव) अशी जोडणी झाली आणि ही लाईन सुरू झाल्यास शेगाव (खामगाव) धाराशिव (तुळजापूर/पंढरपूर) आणि पुढे दक्षीण भारतात बेंगळुरू मद्रास केरळ हा मार्ग प्रशस्त होईल आणि संपूर्ण मराठवाडा हा देशाच्या रेल्वेमार्गावर दिल्ली बेंगळुरू मद्रास आणि मुंबई पुणे विशाखापट्टणम असा जोडला जाईल आणि विकासाचे , रोजगार आणि उद्योगाचे नवे पर्व सुरू होईल यासाठी मराठवाड्यातील सर्वपक्षीय खासदारांनी पुढाकार घेणे आवश्यक असून त्यासाठी मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंच च्या वतीने प्रयत्न केले जातील असेही डॉ संजय लाखेपाटील यांनी सांगितले आहे

डॉ. संजय लाखेपाटील म्हणाले, मराठवाड्याच्या अनुशेषावर केवळ चर्चा पुरेशी नाही. आता कृती आणि जनतेचा दबाव या दोनच गोष्टी निर्णायक ठरतील. सर्वपक्षीय खासदारांनी ‘मातीशी इमान राखून’ संसदेत हा प्रश्न प्राधान्याने मांडावा. तसेच या रेल्वे मार्गासाठी जनजागृती, पाठपुरावा आणि तीव्र आंदोलने उभी राहिली पाहिजेत. त्यांनी पुढे सांगितले की, राज्य आणि केंद्र शासनाने जर हा प्रस्ताव तातडीने मंजूर केला, तर जालना आणि बिड हे रेल्वे नकाशावर ‘विकासाचे नव केंद्र’ ठरतील.

रेल्वे जोडणीचे फायदे अशी आहे की, औद्योगिक गुंतवणुकीस चालना - जालना, बिड, धाराशिव आणि खामगाव येथील औद्योगिक वसाहतींना थेट बाजारपेठांशी जोडणी. कृषी व फलोत्पादन निर्यात वाढ - शेतकऱ्यांचे मालवाहतूक खर्च कमी होऊन स्पर्धात्मक दरात विक्री. पर्यटनाला गती - तुळजाभवानी, औंढा नागनाथ, पैठण, अजिंठा-वेरूळ अशा धार्मिक व ऐतिहासिक स्थळांपर्यंत सहज पोहोच. रोजगार निर्मिती - बांधकाम काळात तसेच रेल्वे सुरू झाल्यानंतर हजारो रोजगार निर्मितीची शक्यता. सामाजिक-सांस्कृतिक एकात्मता - उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ यांना जोडणारा विकासाचा सेतू. त्यामुळे सरकार आणि खासदारांकडून ठोस पाऊले अपेक्षित असल्याचे मत असल्याचे मत डॉ. लाखे पाटील यांनी व्यक्त केले.

फडणवीस सरकारने सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे प्रकल्पाला ज्या तत्परतेने मान्यता दिली, त्याच धर्तीवर खामगाव-जालना-धाराशिव आणि जळगाव-जालना-धाराशिव मार्गांचे सर्वेक्षण व मंजुरी प्रक्रियाही गतीमान करावी, अशी मागणी ‘मराठवाडा अनुशेष निर्मूलन आणि विकास मंच’तर्फे करण्यात आली आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यास मराठवाड्याचा अनुशेष केवळ इतिहासजमा होणार नाही, तर जालना ‘महाराष्ट्राचे रेल्वे हृदय’ म्हणून उदयास येईल अशी आशा देखील त्यांनी व्यक्त केली आहे.

# ३ नोव्हेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ठिक १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

युवा आदर्श

## खरं ...

रेटून बोलता खोटं
खोटे खऱ्यांहून खरं
अवगत नाही सर्वां
कलासार्थ खरोखर
तेचं तेचं पुन्हापुन्हा
सतत पडे कानावर
स्वरूप बदले खोटे
शिक्केबसे मनावर
हट्टा हास आडदांड
आपले वाटे बरोबर
पहिलाबकरा रे पुढे
येतील बाकी बरोबर
पडू नये कधी विसर
जाणीव द्या वरचेवर
खोलात सत्य दडले
आपणपाहे वरचेवर
दिसते दोन्ही सारखे
मीठ अन् ती साखर
चवमात्र विभिन्न पार
फरक जाणवे प्रखर
उसळी मारू वर येई
सत्या होता अनावर
खोटे तेंव्हा लटपटते
शून्य रे सावरा सावर
खरे खोटे खोटे खरे
फसव्या रुपा निखर
फसवले जाऊ कधी
नंतर नसावी खर्खर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.